निवडणुकीच्या कामानिमित्त अधिकारी व कर्मचारी दौऱ्यावर असल्याचेही सांगण्यात आले. तर काही जणांची निवडणूक कामात ड्युटी लवकरच लागणार असल्याचे कळविण्यात आले.

कामकाज नावापुरतेच, गप्पाच अधिक

दिवाळीसाठी गेलेले अधिकारी व कर्मचारी सुट्ट्या संपवून परतले नाहीत. त्यातच निवडणुकांमुळे अधिकारी दौऱ्यावर असल्याचे सांगण्यात आले. परिणामी सर्वसामान्यांचे कामकाज विस्कळीत झाले. जे कर्मचारी कर्तव्यावर हजर झाले, त्यातील मोजक्याच कर्मचाऱ्यांनी दैनंदिन कामकाजाला सुरुवात केली. काहीजण गप्पागोष्टीत गुंग होते. काही मोबाईलवर व्यस्त होते, तर काही परिसरात बाहेरील टपरीवर वेळ घालवत असल्याचे दिसले.

कामानिमित्ताने आलेले गेले परत

शनिवार व रविवार असल्याने काही अधिकारी व कर्मचारी त्या अगोदरच म्हणजे गुरुवारपासूनच सुट्टीवर गेले. त्यामुळे सोमवारी या आठवड्याच्या पहिल्या दिवसापासून तरी कामकाज सुरळीत सुरू होईल, अशी अपेक्षा फोल ठरली. मंगळवारी विविध कामानिमित्त जिल्हा परिषदेतील विविध कार्यालयांत नागरिक आलेले दिसून आले. पण, कामे न झाल्याने सायंकाळी निराश होऊन परत गेले.

मुख्य कार्यपालन अधिकाऱ्यांनी घालावे लक्ष

जिल्हा परिषदेचे कामकाज सुरळीत ठेवण्याची जबाबदारी मुख्य कार्यपालन अधिकाऱ्यांची आहे. मंगळवारला कामकाज सुरु असताना अनेकांच्या खुर्चा रिकाम्या दिसल्या. त्यामुळे अधिकारी व कर्मचारी खरंच निवडणुकीच्या कामावर आहेत, की सुट्ट्यांवर यासंबंधीची पाहणी करणे गरजेचे आहे.

सायबर गुन्हेगार शिकारीच्या शोधात

आवाज भंडारा / प्रतिनिधी

भंडारा : विविध कंपन्यांचे जाळे पसरले आहे. सायबर गुन्हेगार व्यक्तीकडून मोबाईलवर पाठविले जाणारे अनेक फंडे वापरून सायबर गुन्हेगार शिकारीच्या शोधात असतात. ग्राहकांची दिशाभूल करून त्यांच्या घामाचे व कष्टाचे पैसे लुबाडण्याचा काहींचा धंदा सुरु आहे. ग्राहकाची दिशाभूल होत आहे. अनेक अफवांना व खोट्या प्रचाराला ग्राहकांनी बळी पडू नये. ऑनलाईन फसवणुकीचेही प्रकार वाढले असून त्यापासून सावधान होण्याची गरज आहे.

कोरानापासून जास्तीत जास्त आर्थिक व्यवहार ऑनलाईन झाले आहेत. मात्र याच संधीचा फायदा घेत सायबर क्राईम ऑनलाईन फ्रॉडचे प्रमाण देखील वाढले आहेत. कमी दिवसात कमी पैशात जास्त रिटर्न देण्याचे आमिष दाखवून वेगवेगळ्या फंड्यातून नागरिकांची फसवणूक केल्या जात आहेत व नागरिकही केवळ स्वतःच्या फायद्यासाठी चुकीची क्लिक करून या ऑनलाईन फसवणुकीला बळी पडत आहे.

मात्र अशा फसवणुकीला कोणीही बळी पडू नये, असे आवाहन वारंवार सायबर पोलिसांकडून केले जात आहे.

कुंपणात वीज प्रवाह सोडताय; पथक करणार कारवाई

आवाज भंडारा / प्रतिनिधी

भंडारा : वन्यप्राण्यांपासून होणारी पिकांची नासाडी रोखण्यासाठी काही शेतकरी कुंपणात वीज प्रवाह सोडत असतात. ही बाब महावितरणच्या निदर्शनास आली आहे. त्यामुळे वन्यप्राण्यांबरोबरच शेतात कामासाठी गेलेल्या आणि अनवधानाने कुंपणास स्पर्श करणाऱ्या शेतकऱ्यांचा विजेचा शॉक लागून मृत्यू होत असल्याची बाब समोर आली आहे.

याशिवाय वीजही आकडे टाकून चोरून वापरत असल्याचे दिसून आले आहे. याची महावितरणने गंभीर दखल घेतली आहे. यापुढे कुंपणात अनधिकृत वीज प्रवाह सोडलेला आढळल्यास विद्युत कायद्याच्या विविध कलमांअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

मागील काही महिन्यांपासून विजेचा शॉक लागून शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याच्या घटना वारंवार घडत आहेत. याची अधिक खोलात जाऊन चौकशी केली असता महावितरणच्या असे लक्षात आले की, शेतकरी पिकाच्या संरक्षणासाठी वीज वाहिन्यांवर आकोडे टाकून वीज प्रवाह थेट कुंपणात सोडतात. त्यामुळे अनावधानाने संपर्कात आलेल्या प्राण्यांसोबत शेतकऱ्यांचेही मृत्यू झाल्याच्या काही घटना उघडकीस आल्या आहेत. एकंदरीत हा प्रकार वाटतो तितका साधा नसून वीज चोरीबरोबर सदोष मनुष्यवध यासारख्या गंभीर गुन्ह्याशी संबंधित असल्याचे म्हटले आहे.

तसेच जीवितहानी झाल्यानंतर त्याचा दोष

विनाकारण महावितरणवर करण्याचा आणि महावितरणकडून भरपाई मागण्याचा कल देखील दिसून येत आहे.

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आकडे टाकून शेतशिवारात विजेचे सापळे रचले जात आहेत. शेतमालाचे वन्यप्राण्यांपासून रक्षण व्हावे हा यामागील हेतु असला तरी नागरिकांच्या दुर्लक्षपणामुळे मोठ्या प्रमाणात अपघाताच्या आणि प्राणहानीच्या घटना घडत आहेत.

पथक ठेवणार करडी नजर

वीज वाहिन्यांवर अनधिकृतपणे आकोडे टाकून कुंपणात थेट वीज प्रवाह सोडण्याच्या या गंभीर प्रकाराला आळा घालण्यासाठी महावितरणने कायदेशीर कारवाई करण्याचे ठरविले आहे. यासाठी, तांत्रिक कर्मचारी, तसेच भरारी पथकाच्या माध्यमातून शेतशिवा- रावर करडी नजर ठेवण्यात येणार आहे.

सदर प्रकार आढळला तर संबंधित शेतकऱ्यावर विद्युत कायदा २००३ च्या विविध कलमाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येणार आहे, तसेच संभाव्य जीवितहानीची शक्यता लक्षात घेऊन संबंधितावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची विनंती पोलिस विभागाला करण्यात येणार असल्याचे महावि- तरणने कळविले आहे. यावर संपूर्ण जिल्ह्यात भरारी पथक निगरानी ठेवणार आहे.

शेतक-यांनो खबरदारी घ्या...

कुंपणामध्ये वीज प्रवाह सोडणाऱ्या शेतकऱ्याला यापुढे गंभीर कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. संभाव्य जीवितहानीची शक्यता असते. याबाबत फौजदारी गुन्हाही नोंदविला जाऊ शकतो, याची दखल घेत शेतकऱ्यांनी स्वतः या प्रकारामध्ये सहभागी होऊ नये. तसेच कोणी सहभागी होत असल्यास त्याला तसे करण्यापासून परावृत्त करावे, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

कामगारांना किचन सेटचे वितरण अडकले; नोंदणी व नतनीकरणही थांबले

आवाज भंडारा / प्रतिनिधी

भंडारा : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत कामगार म्हणून नोंदणी करणाऱ्या कामगारांना विविध योजनांचा लाभ दिला जातो. जिल्ह्यात आचारसंहिता लागण्यापूर्वी नोंदणी व नूतनीकरणचे काम सुरू होते. तसेच कामगार किटचे वितरणही सुरू होते. परंतु आचारसंहिता सुरू झाल्यानंतर नोंदणीची प्रक्रिया थांबविण्यात आली. त्यामुळे कामगारांना नवीन सरकार सत्तारूढ होईपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत वर्षभर नोंदणी व नूतनीकरणाची मोहीम सुरू असते. सध्या विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू असल्याने नवीन नोंदणी व नूतनीकरण तसेच लाभ वितरणाचीही प्रक्रिया थांबवलेली आहे. इमारत व इतर बांधकाम क्षेत्राशी संबंधित कामगारांनी नोंदणी केल्यास त्यांना संरक्षक किटसह विविध साहित्याचा लाभ दिला जातो. हा लाभ मिळावा यासाठी कामगार नोंदणी करतात. परंतु, सध्या विधानसभेची निवडणूक सुरू आहे.

महिनाभर करावी लागणार प्रतीक्षा

जिल्ह्यात आचारसंहिता लागू होईपर्यंत सक्रिय कामगारांना किचन संच वितरणाचे काम हाती घेण्यात आले होते. काही कामगारांना किट संचचे वितरण करण्यात आले. बहुतांश मजूर अद्यापही किचन संच लाभाच्या प्रतीक्षेत आहेत. हे किचन संच केव्हा मिळणार, याची प्रतीक्षा कामगारांना आहे. किचन संचामध्ये विविध प्रकारच्या

साहित्यांचा समावेश आहे. आता निवडणूक संपेपर्यंत म्हणजे साधारणतः महिनाभर प्रतीक्षा करावी लागणार आहे.

३० हजारांवर सक्रिय कामगार

जिल्ह्यात ३० हजारांवर सक्रिय कामगार आहेत. हे कामगार दरवर्षी नूतनीकरण करतात. कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचा लाभसुद्धा दिला जातो.

कामगारांना असे मिळतात लाभ

सामाजिक सुरक्षा पहिल्या विवाहाच्या प्रतिपूर्तीसाठी ३० हजार रुपये, मध्यान्ह भोजन योजना, प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना, प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, पूर्व शिक्षण ओळख प्रशिक्षण आदी आदी सामाजिक सुरक्षेच्या योजना राबविल्या जातात. सदर योजनांचा लाभ पात्र कामगारांना दिला जातो.

शैक्षणिक सुविधा

इयत्ता पहिली ते सातव्या विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्ष दोन हजार ५००, तर इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्ष ५ हजार रुपये. इयत्ता दहावी व बारावीमध्ये किमान ५० टक्के किंवा अधिक गुण प्राप्त झाल्यास १० हजार रुपये. वैद्यकीय पदवी- करिता प्रतिवर्षी १ लाख रुपये. अभियांत्रिकी पदवीकरिता प्रतिवर्षी ६० हजार रुपये.

आरोग्यविषयक

नैसर्गिक प्रसुतीसाठी १५ हजार रुपये, शस्त्रक्रियेद्वारे प्रसुतीसाठी २० हजार रुपये, गंभीर आजाराच्या उपचारार्थ १ लाख रुपये, एका मुलीच्या जन्मानंतर कुटुंबनियो जनाची शस्त्रक्रिया केल्यास त्या मुलीच्या नावे १८ वर्षापर्यंत १ लाख रुपये मुदत ठेव. ७५ टक्के किंवा कायमचे अपंगत्व आल्यास दोन लाख रुपये. तसेच आरोग्य योजनेचा लाभ मिळतो.

कोण जिंकले, कोण हरले? आमचे दिवस सारखेच

आवाज भंडारा / प्रतिनिधी

सिल्ली : जिल्ह्यात येत्या दि. २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीसाठी एकाच टप्प्यात मतदान असल्याने प्रत्येक मतदाराला निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावताना अडथळा येऊ नये. यासाठी मतदानाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी देण्यात आली. सरकारी कर्मचाऱ्यांना या दिवसाचा पूर्ण पगार मिळणार आहे. मात्र शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी अकुशल कामगार यांनी मतदानासाठी सुट्टी घेतल्यास पूर्ण दिवसाची मजुरी मिळणार नाही. निवडणुकीत कोण जिंकले, कोण हारले? आमचे सर्व दिवस सारखेच असल्याची शेतकरी तसेच इतर मजूरवर्गाची प्रतिक्रिया आहे.

देशाच्या लोकशाहीत मतदानाला फार महत्त्व आहे. १८ वर्षांवरील सर्व मतदारांनी मतदान करणे आवश्यक असून, मतदानाचा दिवशी सरकारी कर्मचारी यांना भरपगारी सुट्टी देण्यात आली. तसेच उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या प्रत्येक उपक्रम व आस्थापनेला पूर्ण दिवस सुटी देणे शक्य नसल्यास मतदानासाठी संबंधित जिल्हाधिकारी / जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्वपरवानगी दोन तासांची सवलत मिळणार असून, कर्मचाऱ्यांना मतदानासाठी मीडवीक ऑफ मिळणार आहे. कर्मचाऱ्यांचा पगार न कापता मतदानाचा हक्क बजावता येणार आहे.

मात्र देशाच्या पोशिंदा असलेले शेतकरी, शेतमजूर, रोजंदारीवर काम करणारे मजूर, अकुशल कामगार, कारागीर, कंत्राटी मानधनावर काम करणारे असंघटित रोजंदार, हातावर पोट असलेले कष्टकरी यांना सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे कामावर न जाता मतदानासाठी एक दिवसाची पूर्ण रोजंदारीची मजुरी मिळेल काय? एक दिवस कामावर न गेल्यास संध्याकाळची चूल पेटणार की अशी गरीब जनतेची अवस्था आहे. त्यामुळे निवडणुकीच्या सार्वजनिक सुट्टीचा आम्हाला काय फायदा? असा कष्टकरी जनतेचा सवाल आहे. दरम्यान निवडणुकीनंतर कष्टकरी व गरजुंना त्यांच्या समस्यांवर विचार करणारे सरकार हवे आहे. वारंवार निवडणुकीत आम्ही मतदान करतो परंतु गंभीरपणे विचार केला जात नाही.

निवडणूक झाल्यावर लोकप्रतिनिधी आणि कर्मचारी यांचा विचार होतो. मात्र सरकार निवडून देणाऱ्या सामान्य जनतेच्या आयुष्य म्हणजे मातीत जगणे अन- मातीतच मरण्यासारखे आहे.

- सोमेश्वर राघोर्ते

देशी कट्ट्यासह एक जिवंत राऊंड काडतूस जप्त

आवाज भंडारा / प्रतिनिधी

भंडारा : निवडणुकीच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने अवैध व्यवसायाविरुद्ध विशेष मोहीम सुरु केली आहे. दरम्यान महाकाली कॉलरी येथील शुभम उर्फ खंजरभाई वासेकर (२२) याच्याजवळ बंदूक असल्याची माहिती मिळाली. याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याच्याकडे एक गावठी देशी कट्टा व जिवंत राऊड आढळून आले. पोलिसांनी देशी कट्टा व जिवंत राऊड जप्त करुन शुभमला बेड्या ठोकल्या आहे. या माहितीच्या आधारावर आरोपीसह स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शुभमला वेकोली एरिया रेती बंकर, बाबानगर बायपास रोड येथे ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली. एक गावठी देशी कट्टा, एक जिवंत राउंड असा १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

ये दिवाली माय भारत वाली कार्यक्रम उत्साहात साजरा

जे.एम.पटेल महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचा उपक्रम

आवाज भंडारा / प्रतिनिधी

भंडारा : स्थानिक जे. एम. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालय नवी दिल्ली यांचे निर्देशांनुसार वाहतूक नियंत्रण शाखा भंडारा, जिल्हा सामान्य रुग्णालय भंडारा आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने ये दिवाली-माय भारत वाली कार्यक्रमाचे आयोजन केले.

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील दहा महाविद्यालयांची निवड करण्यात आली. जे. एम.पटेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विकास ढोमणे यांचे मार्गदर्शनात व सक्षम नेतृत्वात 'माय भारत' अंतर्गत कार्यक्रम यशस्वीरीत्या घेण्यात आले. सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री निलेश गिरी यांच्या मार्गदर्शनात वाहतूक नियंत्रण शाखा भंडारा व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी भंडारा शहरातील विविध चौकांमध्ये वाहतूक नियंत्रण करण्याचे कार्य केले. वाहतूकीचे नियम न पाळणाऱ्या प्रवाशांना गुलाबाचे फुल व चॉकलेट देऊन त्यांना वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत समजावण्यात आले.

स्वच्छतेचे महत्व समजावून देण्याच्या उद्देशाने भंडारा शहरातील बडा बाजार परिसर राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छ केला. जिल्हा सामान्य रुग्णालय भंडारा येथे श्री मनोज येरणे व श्री सुरेश ठाकरे यांनी एचआयव्ही/एड्स बद्दल व त्याच्या उपचाराविषयी माहिती दिली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी एचआयव्ही/एड्स बाधित रुग्णांशी संवाद साधून त्यांना सेवा दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. भोजराज श्रीरामे, प्रा. सुनील शेंडे डॉ. प्रतिमा पालीवाल, डॉ. नयना सोनवाने, श्री मनीष शेंडे, श्री अमोल सातपुते, श्री पियुष संगतसाहेब व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

सोळा महिन्यांत तीन परवाने रद्द, ६८ औषधी दुकाने निलंबित

आवाज भंडारा / प्रतिनिधी

भंडारा : एप्रिल २०२३ ते ३१ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत अन्न व औषधी प्रशासन विभाग, भंडाराच्या वतीने जिल्ह्यातील अनेक औषधी दुकानांची तपासणी करण्यात आली. यात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार आढळून आल्याने तीन औषधी दुकानांचे परवाने रद्द करण्यात आले. तसेच स्टॉक व विक्रीत तफावत तसेच अन्य कारणांसाठी ६८ दुकानांचे परवाने निलंबित करण्यात आले. ही कारवाई औषधी निरीक्षकांच्या तपासणीअंती सहायक आयुक्त (औषधी) मेनिका धवड यांनी केली.

औषधी व सौंदर्य प्रसाधन कायदा १९४० व नियम १९४५ अंतर्गत औषध विक्री व साठवणूक यासंबंधीच्या मार्गदर्शक सूचना मेडिकल स्टोअर्स चालकांना देण्यात आल्या आहेत. परंतु, अनेकदा औषध विक्रेते नियम

व कायद्याचे पालन न करता मनमर्जीने औषधांची विक्री करीत असतात. तसेच ग्राहकांना बिल न देणे, स्टॉक बूकवर नोंदी न घेणे, प्रतिजैविक औषधांचे बिल न देणे तसेच अन्य गैरप्रकार करताना दिसून येतात.

यामुळे ग्राहकांचे तसेच शासनाचे नुकसान होत असते. शिवाय डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शन शिवाय औषधे विकल्यास त्याचे गंभीर परिणाम रुग्णांना भोगावे लागण्याची शक्यता असते. यावर आळा घालण्यासाठी अन्न व औषधी प्रशासन विभागांच्या निरीक्षकांतर्फे औषध दुकानांचे तपासणी करण्यात येत असते.

या दुकानांचे परवाने झाले रद्द

औषधे डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनविना विकणे व अन्य कारणांसाठी मे. कोरे मेडिकल अँड जनरल स्टोअर्स पळसगाव सोनका, मे. अक्षय मेडिकल स्टोअर्स मोहाडी, मे. कुसुम मेडिकल स्टोअर्स कांद्री आदी तीन दुकानांचे परवाने रद्द करण्यात आले.

४६ दुकानदारांनी स्वतःहून केले परवाने रद्द

जिल्ह्यात औषधी दुकानांत मोठ्या प्रमाणात स्पर्धा वाढीस लागली आहे. त्यातच शहरातील बहुतेक डॉक्टरांनी स्वतःचेच मेडिकल स्टोअर्स उघडले आहेत. त्यामुळे अन्य मेडिकल स्टोअर्स चालनासे झाले आहेत. किराणा व स्वतःची मजुरीही दुकानातून निघत नसल्याने जिल्ह्यातील ४६ औषध विक्रेत्यांनी स्वतःहून दुकानांचे परवाने रद्द करण्याचे पत्र दिले. त्यामुळे त्यांचे परवाने रद्द करण्यात आले.

विक्रेत्यांनी या बाबींची घ्यावी काळजी

नोंदणीकृत फार्मासिस्ट दुकानात बसावे व स्वतःच्या देखरेखीत औषधांची विक्री करावी. सेक्स तसेच झोपेच्या गोळ्या व अन्य गंभीर आजारावरील औषधी डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय विक्री करू नये. औषधांची विक्री व स्टॉकची माहिती अद्ययावत ठेवावी. व्हेटर्नरी औषधांची साठवणूक लेबलसह करावी.

औषध विक्रेत्यांनी नियम व कायद्याचे पालन करीत औषधांची विक्री करण्याचे गरजेचे आहे. परंतु, मेडिकल स्टोअर्स चालकांनी हयगय केल्याने तसेच औषधी निरीक्षकांच्या तपासणीत दोषी आढळून आल्याने तिघांचे परवाने रद्द तर ६८ जणांचे परवाने निलंबित करण्यात आले.

- मेनिका धवड, सहायक आयुक्त (औषधी), भंडारा.

भंडारा जिले में 8 हजार 416 वरिष्ठ नागरिक करेंगे मतदान

विकलांग मतदाताओं की संख्या साढे सात हजार..

आवाज भंडारा / प्रतिनिधी

भंडारा : जिले में तुमसर, भंडारा एवं साकोली ऐसे तीनों विधानसभा क्षेत्र के लिए चुनावी प्रक्रिया 20 नवंबर को पूरी होगी। जिसके लिए मतदाताओं की अब तक की सूची के अनुसार जिले में कुल 10 लाख 7 हजार 555 मतदाता चुनावी प्रक्रिया में शामिल होंगे। जिनमें से 85 वर्ष की आयु के पार कुल आठ हजार 416 ज्येष्ठ नागरिकों का समावेश हैं। जिनके लिए घर में मतदान करने की सुविधा चुनाव आयोग की सूचनाओं के अनुसार पूरी होगी।

भंडारा विधानसभा क्षेत्र के लिए कुल तीन लाख 73 हजार 828 मतदाता मतदान प्रक्रिया में शामिल होंगे। साकोली विधानसभा क्षेत्र के तहत मतदाताओं की संख्या तीन लाख 26 हजार 999 तक पहुंची है। तुमसर विधानसभा क्षेत्र के लिए तीन लाख 6 हजार 728 मतदाताओं मतदान करेंगे।जिसमें से तीनों विधानसभा क्षेत्र के लिए कुल 8 हजार 416 ज्येष्ठ नागरिक मतदान करेंगे। जेष्ठ नागरिक एवं विकलांग मतदाताओं को घर मे मतदान करने की सुविधा का लाभ लेना है तो उन्हे फार्म नंबर 12 डी भरकर आवेदन करना होगा। अब तक 1 हजार 409 आवेदन गृह मतदान के लिए प्राप्त हुए है। जिसमें से 1 हजार 375 आवेदन मंजूर किए गए हैं।

जिले में 7 हजार 513 विकलांग मतदाता :

भंडारा विधानसभा क्षेत्र के में चुनावी सूची के अनुसार 1 हजार 876 विकलांग मतदाता है। साकोली विधानसभा के लिए 3 हजार 175 विकलांग मतदाता मतदान करेंगे। तुमसर विधानसभा क्षेत्र के लिए 2 हजार 462 विकलांग मतदाता मतदान की प्रक्रिया में शामिल होंगे।

डेढ़ हजार से ज्यादा कर्मचारी हैं वोटर्स : शासकिय एवं निम शासकिय सेवाओं में कार्यरत कर्मचारियों की संख्या जिले में कुल 1 हजार 762 इतनी है। जिसके लिए मतदान की प्रक्रिया के लिए पोस्टल वोटिंग द्वारा चुनावी प्रक्रिया पूरी की जाएगी।

बाघिन सुहानी और शावकों का भ्रमण जारी

आवाज भंडारा / प्रतिनिधी

भंडारा : लाखनी तहसील के सीपेवाड़ा रोड पर भंडारा प्रादेशिक वन विभाग क्षेत्र की बाघिन 'सुहानी' अपने दो शावकों के साथ दिखाई दे रही है, जिससे इलाके में हलचल मच गई है. बाघिन को करीब से देखने की इच्छा में बड़ी संख्या में लोग वहां जमा हो रहे हैं. वन विभाग के सहायक वन संरक्षक संजय मेंढ़े अपनी टीम के साथ मौके पर मौजूद हैं, ताकि किसी भी अप्रिय घटना से बचा जा सके. लोगों की सुरक्षा के मद्देनजर पुलिस जवान भी तैनात किए गए हैं.

बाघिन को देखने के लिए जमा रही लोगों की भीड़ हालांकि, सुबह हो या शाम, बाघिन और उसके शावकों को देखने के लिए लोगों का झुंड इकठ्ठा हो रहा है, जिससे शावक विचलित हो सकते हैं. वन विभाग ने बार-बार चेतावनी दी है कि इस तरह का व्यवहार न केवल बाघिन और शावकों के लिए तनावपूर्ण हो सकता है, बल्कि लोगों के लिए भी खतरनाक साबित हो सकता है. वन विभाग लोगों से अपील कर रहा है कि वे इस क्षेत्र से दूर रहें और किसी भी संभावित घटना को रोकने में सहयोग करें.

अवैध शराब अड्डे पर पुलिस की छापेमारी

21 लाख का माल जब्त 26 लोगों पर मामला दर्ज

आवाज भंडारा / प्रतिनिधी

भंडारा : विधानसभा चुनाव के अनुरूप जिले में कानून, शांति और व्यवस्था बनाए रखने के लिए भंडारा पुलिस बल द्वारा ऑपरेशन वॉश आउट चलाया जा रहा है. इसी के तहत रविवार को विभिन्न स्थानों पर छापेमारी की गई और अवैध शराब बिक्री के अड्डे और शराब बनाने की भट्टियां छापेमारी कर लाखों रुपयों का माल जब्त किया गया. चुनाव के मद्देनजर बड़ी मात्रा में अवैध शराब का कारोबार होता है.

इस पर अंकुश लगाया जाए और चुनाव के दौरान कोई अप्रिय घटना न घटे. साथ ही यह भी सुनिश्चित करने के उपाय किये जा रहे हैं कि कानून-व्यवस्था की कोई समस्या न हो. जिला पुलिस अधीक्षक नुरुल हसन के मार्गदर्शन में विशेष अभियान चलाया गया.

इस अभियान में जिले के 17 पुलिस स्टेशनों के प्रभारी और अधिकारियों के साथ-साथ स्थानीय अपराध शाखा के अधिकारियों ने कार्रवाई की. शराब बंदी कानून के अनुसार के तहत 26 आरोपियों के विरुद्ध मामला दर्ज कर 21,31,395 रुपये मूल्य की 11,986.86 लीटर शराब जब्त की गई.

सानगडी नाले में पाई गई 200 मृत मुर्गियां

ग्राम पंचायत ने कराई सफाई, टला खतरा

आवाज भंडारा / प्रतिनिधी

साकोली : साकोली-सिरोंचा राष्ट्रीय राजमार्ग पर सानगडी में एक अज्ञात वाहन चालक ने लगभग 150 से 200 मृत मुर्गियों को नाले में फेंक दिया. जिससे दिवाली के दौरान मानव और जानवरों के लिए रोग फैलने का खतरा बढ़ गया. लेकिन स्थानीय ग्रामपंचायत ने समय पर कार्रवाई की, जिससे बड़ा अनर्थ टल गया. साकोली तहसील के सानगडी में राष्ट्रीय राजमार्ग पर नाला है. कृषि और पशुधन के लिए प्रचुर मात्रा में पानी एकत्रित हो सके, इसलिए सिमेंट का बंधारा बनाया गया हैं.

1 नवंबर की रात को मुर्गियों से भरे वाहन का चालक पुल पर रुककर ये मृत मुर्गियां नाले में फेंक कर चला गया. जब कुछ लोगों ने इस बारे में चिकित्सा अधिकारी डॉ. नितीन तिरपुडे को जानकारी दी, तो वह अपने दल के साथ घटनास्थल पर पहुंचे. वहां उन्होंने सरपंच सविता उप्रीकर और पुलिस को सूचित किया. सभी संबंधित अधिकारी मौके पर पहुंचे और देखा कि मृत मुर्गियां नाले में चारों ओर बिखरी हुई हैं, जिन्हें मछलियां खा रही थीं और वहां दुर्गंध फैल रही थी.

इस स्थिति से गंदगी और रोग फैलने से बचाने के लिए सरपंच ने तुरंत अपने कर्मचारियों को मुर्गियों को एकत्रित करने के लिए काम पर लगाया. जेसीबी की मदद से उन्हें गड्ढे में दफन किया गया, जिससे एक बड़ी समस्या टल गई.

दोपहिया से गिरकर पति-पत्नी घायल

राष्ट्रीय राजमार्ग की घटना

आवाज भंडारा / प्रतिनिधी

भंडारा : तेज रफ्तार दोपहिया वाहन पर नियंत्रण खो देने से पति और पत्नी सड़क पर गिरकर घायल होने की घटना रविवार 3 नवंबर शाम को राष्ट्रीय राजमार्ग पर भीलेवाड़ा में पेट्रोल पंप के पास घटी. घायलों के नाम शहापूर निवासी नितीन तितिरमारे (48), सरिता तितीरमारे (42) हैं.

दंपत्ति अपनी स्कूटी से लाखनी से शाहपुर जा रहे थे. भीलेवाड़ा में पेट्रोल पंप के पास दोपहिया वाहन से नियंत्रण खोने के कारण वे दोनों सड़क पर गिर गए. दोनों गंभीर रूप से घायल हो गये. कारधा थाने के कांस्टेबल सचिन बावनकुले ने नरेंद्राचार्य संस्थान की एंबुलेंस को मौके पर बुलाया.

एम्बुलेंस चालक प्रमोद मोहतुरे ने पुलिस कांस्टेबल दुर्योधन बाभरे की मदद से घायलों को एंबुलेंस से इलाज के लिए निजी अस्पताल में भर्ती कराया गया.

मधुमक्खियों के हमले में सात मजदूर घायल

फसल काटते समय मलिदा खेत परिसर में हुई घटना

आवाज भंडारा / प्रतिनिधी

मोहाड़ी : धान की फसल की कटाई के लिए गए मजदूरों पर अचानक मधुमक्खियों ने हमला कर दिया। इसमें 7 मजदूर घायल हो गए। घटना मोहाड़ी तहसील के मलिदा गांव के खेत परिसर में शुक्रवार 1 नवंबर को हुई।

घायलों का नाम कल्पना सपाटे, रीना नगरे, शोभा धुमनखेडे, सविता धुमनखेडे, नेहा धुमनखेडे, मंगला धुमनखेडे, नेहा धुमनखेडे, दुर्योधन विठ्ठले है।

मलिदा गांव के सरपंच कैलाश मते के खेत में गांव के 8 से 10 मजदूर धान की फसल की कटाई करने के लिए गए थे। कटाई करते समय अचानक मधुमक्खियों ने मजदूरों पर हमला किया।

इसमें मजदूर घायल हो गए।

घायलों को इलाज के लिए आंधलगांव के निजी अस्पताल में ले गए। इलाज के पश्चात 6 मजदूरों को घर भेजा गया। किंतु कल्पना सपाटे के कान में मधुमक्खी घुसने से उसको भंडारा रेफर किया गया।

तेंदुए के हमले में 8 बकरियों की मौत

आवाज भंडारा / प्रतिनिधी



लाखनी : आध्याल वन क्षेत्र के अंतर्गत आने वाले सहवनक्षेत्र किटाडी के गोंडेगांव में तेंदुए द्वारा तवेली में बंधी बकरियों पर हमला किया गया, जिससे आठ बकरियों की मौत हो गई. यह घटना शुक्रवार नवंबर की सुबह सामने आई. पशुपालक गोंडेगांव निवासी देवा दशरथ वाढई को करीब 1 लाख रुपये का नुकसान हुआ है. वन विभाग को घटना की सूचना दी गई है. लेकिन पशुपालकों में भय का माहौल बन गया है.

देवाजी वाढई, जो एक छोटे किसान हैं, अपने परिवार का गुजारा करने के लिए बकरी पालन का व्यवसाय करते हैं. गुरुवार रात उन्होंने बकरियों को चारा-पानी देकर तबेले में बांधा और परिवार सहित सो गए. इस दौरान रात के समय तेंदुआ तबेले में घुसकर बकरियों पर हमला कर दिया. इस हमले के दौरान बकरियों की चिल्लाने की आवाज से पशुपालकों की नींद खुली, जिसके बाद उन्होंने तबेले में जाकर देखा तो आठ बकरियां मृत पड़ी थी. इस घटना की जानकारी वन विभाग को दी गई.

सहवनक्षेत्र अधिकारी एम. वी. शामकुवर के मार्गदर्शन में वनरक्षक संदीप गायकवाड़ (बिट रंगीला), वनरक्षक सविता रंगारी (बिट डोंगरगांव), वनरक्षक एम.एल. शहारे (किटाडी) और अन्य वन कर्मचारी मौके पर पहुंचे. मृत बकरियों का पंचनामा किया गया और पशु चिकित्साधिकारी हटवार ने शव का पोस्टमॉर्टम किया. इसके बाद बकरियों के शवों को जमीन में दफना दिया गया.

नाबालिग पर अत्याचार

आरोपी को भेजा जेल

आवाज भंडारा / प्रतिनिधी

भंडारा : युवक ने 17 साल की नाबालिग लड़की से पहचान कर और उसके साथ अत्याचार करने की घटना सामने आई है. पीड़ित युवती की शिकायत पर सिहोरा पुलिस ने वांगी तहसील तुमसर निवासी श्रीकृष्ण धीरेंद्र पटले (23) के खिलाफ मामला दर्ज किया गया है. पुलिस के मुताबिक, नाबालिग लड़की जब बैंक ऑफ इंडिया सिहोरा में अपना खाता चेक करने गई तो उसकी मुलाकात श्रीकृष्ण से हुई.

उसने अपना मोबाइल नंबर दे दिया. घर छोड़ने के बहाने वह 27 सितंबर को नाबालिक को चांदपुर घुमाने ले गया. उसने चांदपुर जंगल परिसर में उसके साथ अत्याचार किया. इसके बाद 29 और 30 सितंबर को फिर से पीड़ित लड़की को चांदपुर ले जाया गया और दोबारा वही हरकत की गई. उसने इसके बारे में किसी को बताया तो मारने की धमकी दी. पीड़िता ने शिकायत की. सिहोरा थाना में धारा 69,351 (2), उपधारा 4,6, पॉस्को एक्ट के तहत मामला दर्ज किया गया. उक्त अपराध में आरोपी को 31 अक्टूबर को गिरफ्तार कर न्यायिक हिरासत में भंडारा भेज दिया गया. थानेदार नितिन मदनकर के मार्गदर्शन में पुलिस उपनिरिक्षक हरिदास पुसराम, अंमलदार तिलक चौधरी जांच कर रहे हैं

चरवाहे के ऊपर से दौड़ा डेढ़ सौ गायों का झुंड

जांभोरा में अद्भुत गोधन पूजा

आवाज भंडारा / प्रतिनिधी

करडी : कल्पना कीजिए कि आप जमीन पर लेटे हैं और ऊपर से दौड़ती चली आ रही है डेढ़ सौ गायों की टोली। मोहाड़ी तहसील के जांभोरा गांव में हर साल बलिप्रतिपदा पर गोधन पूजा के दौरान यह हैरतअंगेज दृश्य देखने को मिलता है. इस साल भी विनायक परतेकी (35) के शरीर के ऊपर से इन गायों का झुंड बिना रुके गुजर गया और वह सुरक्षित और अचंभित रह गए. यह परंपरा 150 साल पुरानी है, जो परतेकी परिवार ने शुरू की थी और आज तक हर वर्ष निभाई जा रही है.

इस पूजा में गांव की सभी गायों को नहलाया जाता है, उनकी सोंगों को सजीली रस्सियों से सजाया जाता है और फिर चावल के हलवे से उनका स्वागत होता है. इसके बाद गांव के मुख्य चौक तक गायों की रैली निकाली जाती है. चरवाहे जमीन पर लेट जाते हैं और गायों का झुंड उनके शरीर से गुजरता है. न तो डर का कोई निशान और न ही चोट का कोई संकेत.

यह दृश्य देखने के लिए हर साल सैकड़ों लोग यहां आते हैं, जिन्हें इस रोमांचकारी परंपरा पर विश्वास और हैरत दोनों होता है. विनायक परतेकी का कहना है कि, यह गोमाता का आशीवांद है जो हमें सुरक्षित रखता है. यह आस्था और निष्ठा का प्रमाण है. 150 सालों से यह परंपरा किसी को नुकसान पहुंचाए बिना जारी है और हमें विश्वास है कि यह आगे भी ऐसे ही चलती रहेगी.

अपराधी चंदू फुंडे तड़ीपार

आवाज भंडारा / प्रतिनिधी

लाखनी : भंडारा जिले के साकोली उपविभागीय अधिकारी अश्विनी मांजे ने लाखनी तहसील के सोनमाला निवासी चंदू भास्कर पुंडे को भंडारा जिले से तीन महीने के लिए तड़ीपार करने का आदेश जारी किया है. 38 वर्षीय चंदू पुंडे के खिलाफ रेती तस्करी, चोरी, सरकारी कर्मचारियों को धमकाने और मारपीट जैसे कई गंभीर मामले दर्ज है.

पुलिस अधीक्षक भंडारा के पत्र के तहत मुंबई पुलिस अधिनियम, 1951 की धारा 56 (1) (अ) (ब) के तहत यह आदेश पारित किया गया. यह आदेश 15 अक्टूबर 2024 से अगले तीन महीनों तक लागू रहेगा.

चंदू पुंडे के खिलाफ साकोली पुलिस थाने में विभिन्न धाराओं के तहत मामले दर्ज हैं, जिसमें चोरी (धारा 379), सार्वजनिक संपत्ति नुकसान (1984 अधिनियम), सरकारी कर्मचारी से मारपीट (धारा 353), और धमकी देना शामिल हैं.

इसके अलावा, महाराष्ट्र भूमि राजस्व संहिता, 1966 के तहत भी उनके खिलाफ मामला दर्ज है. इस प्रकार के मामलों के कारण चंदू को जिले की शांति और कानून व्यवस्था के लिए खतरा मानते हुए उपविभागीय अधिकारी ने यह सख्त कदम उठाया है.

साप्ताहिक आवाज भंडारा हे वृत्तपत्र मालक, प्रकाशक, संपादक शमेशर वाहब खान यांनी राकेश प्रिंटींग प्रेस राजिव गांधी चौक, साई मंदीरसमोर तकीया वार्ड , भंडारा येथे छापून साप्ताहिक आवाज भंडारा कार्यालय, तकीया दर्गाह जवळ, तकीया वार्ड भंडारा येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक -शमशेर खान मोबाईल नंबर - ७९७२७९५६५५ ईमेल-awazbhandara@gmail.com Owner,Publisher, ShamsherWahab Khan on behalf Of Weekly Awaz Bhandara Printed at Rakesh Printing Press, Rajiv Gandhi Chowk(TakiyaWard) Opp.sai mandir Bhandara-441904 and Published at takiya Dargah near Old Majjid, Takiya ward Bhandara 441904 Editor-Shamsher Khan Mo.7972795655
Email- awazbhandara@gmail.com प्रकाशित समाचारों से संबंधित कोई भी वाद भंडारा न्यायालय अंतर्गत निपटारा किया जाएगा !